# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन,मुख्य कार्यालय, छत्रपति शिवाजी महाराज मार्ग,
भाईदर (प.) ता. जि. ठाणे, ४०१ १०१.

**महिला व बालकल्याण विभाग**

जा.क्र.मनपा/ मबावि/ ५६ /२०२२-२३ दि ५/७/२०२२

## // जाहीर निविदा //

महिला व बालकल्याण योजेने अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकातील महिलांकरिता योगा प्रशिक्षण देणेकामी (अंदाजित खर्च रु.७,५०,०००/-) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या ई-टेंडरिंग वेबसाइट **www.mbmc.gov.in** **Off-line** पध्दतीने इच्छुक अनुभवी ठेकेदाराकडून बी-१ नमुन्यात निविदा मागविण्यात येत आहेत. सदरकामी अधिक माहिती महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागात दि. ६ / ७ /२०२२ रोजी पर्यंत उपलब्ध होईल. तसेच भरलेल्या निविदा दि.१४/ ७ /२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत महिला व बालकल्याण विभागात स्विकारण्यात येतील. सदरकामी निविदा फॉर्म फी रु.१६००+ जी.एस.टी १८% असे एकूण रक्कम रु.१८८८/- व इसारा रक्कम रु.८,०००/- रोखीने दि.१२/७/२०२२ रोजी दु. ३.०० वाजेपर्यंत भरुन त्याची पावती निविदा दरपत्रका सोबत जोडणे बंधनकारक राहिल.

सदरील निविदा शक्यतो त्याच दिवशी आवश्यक त्या कागदपत्राची पुर्तता केली असल्यास उघडण्यात येतील. सदरकामी निविदा मंजुर होताच आदेशानुसार त्वरीत काम करावे लागेल. तसेच कोणतेही कारण न देता एक निविदा स्विकारण्याचा अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार मा आयुक्त सो. यांनी राखून ठेवला आहे.

**संजय शिंदे**
**उपायुक्त(मबाक)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

ठिकाण :- भाईंदर
दिनांक :- ५/७/२०२२.
प्रत :- संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता.
संगणक विभाग

D:\Shinde Madam\Mahila Balkalyan Vibhag\Tender\Tender 2017-18\19-20\2020\21\2022-23\Online Tender-22-23\Yoga Prashishan- Offline Tender-2022-23.Doc

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन,मुख्य कार्यालय, छत्रपति शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.)ता. जि. ठाणे, ४०१ १०१.

**महिला व बालकल्याण विभाग**


जा.क्र.मनपा/मबाक/५६/२०२२-२३ दि.५/७/२०२२

## // निविदा दरसुची //

कामाचे नांव :- महिला व बालकल्याण समिती अंतर्गत योगा प्रशिक्षण

निविदा भरणा-याचे नाव व पत्ता :----------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------------------------

व्यवसायाचे / संस्थेचे नाव व पत्ता :--------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------------------------

निविदा इसारा रक्कम रु. -------------------- (अक्षरी रु.--------------------------------------------

भरणा पावती क्र.---------------------------------- दिनांक -----------------------------------------

| अ.क्र | तपशिल | एकुण दर |
|---|---|---|
| १. | योगा प्रशिक्षण | |

**निविदा सादर करताना दोन लिफाफा पध्दतीने खालीलप्रमाणे कराव्यात.**

अ) **लिफाफा क्र. १. मध्ये (Envelop No. 1)**

1) नोंदणीकृत शासकीय/खाजगी संस्थेमधून योगा, प्राणायाम कोर्स पूर्ण केल्याची प्रमाणपत्र (पदवी /पदविक्त)
2) बयाना रक्कम (EMD)
3) पॅन कार्ड व जी.एस.टी. प्रमाणपत्र
4) संस्थचे कार्यालय मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात असल्याबाबतचे दुकान अधिनियम नोंदणी प्रमाणपत्र (गुमास्ता)
5) संस्थेने शासकीय / निमशासकीय संस्थेस किंवा खाजगी संस्थेतेस योगा प्रशिक्षण दिल्याचा अनुभव दाखला
6) प्रशिक्षणाचा कालावधी दररोज किमान 2 तास (45 दिवस)
7) **महिला भवन मधील प्रशिक्षणा केंद्रामध्ये एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करणे आवश्यक राहिल.** सदर प्रशिक्षणामध्ये खालील अभ्यासक्रम अंतर्भुत असणे आवश्यक आहे.



lw

| अनु.क्र | योग अभ्यासक्रम |
|---|---|
| 1) | प्राणायाम-प्रणव-भस्तिका-अग्निसार, कपालभारती, अलोम+विलोम, बाहयप्रणायम, उदिउन-भांवरी |
| 2) | आसन-चक्रासन, ताडसन, वक्रासन, धर्नुआसन, उत्त्रंजन, त्रिकोणासन, अर्ध-चक्रासन, वक्रासन, वज्रासन, शलायसन, पवन, मुक्तआसन, सवासन, ध्यान, ताडासन |
| 3) | सुर्यनमस्कार- 11Steps |
| 4) | आहार-डाईटप्लान इत्यादी |

ब) लिफाफा क्र. २. मध्ये (**Envelop No. 2**)

१. दरसुची (**Rate list**)

निविदाधारकाची सही व शिक्का

bw

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन,मुख्य कार्यालय, छत्रपति शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
ता. जि. ठाणे, ४०१ १०१.

## महिला व बालकल्याण विभाग

जा.क्र.मनपा/मबाक/ ५६ /२०२२-२३ दि . ५ / ७ /२०२२

### निविदा दरपत्रकाविषयी अटीशर्ती सन २०२२-२३

१) निविदा संबधीत सविस्तर माहीती संबंधीत खात्यात विनामुल्य मिळेल.

२) निविदा फॉर्म किंमत निविदेसोबत भरणे बंधनकारक राहिल.

३) सदर निविदेसोबत इसारा रक्कम भरणे बंधनकारक राहिल.

४) इसारा रक्कमे वर कोणत्याही प्रकारचे व्याज किंवा विलंब आकार दिले जाणार नाही.

५) निविदाधारकाने निविदा दरपत्रकातच दर भरुन महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाकडे सादर केले पाहिजेत.

६) निविदाधारकाने त्यांचे नाव, संपुर्ण पत्ता व संपर्क दुरध्वनी क्रमांक इत्यादी माहिती देणे आवश्यक आहे.

७) निविदाधारकाने निविदा दरपत्रात प्रत्येक दराची माहिती विहित केलेल्या नमुन्यात रकान्यात स्पष्ट अक्षरात अंकी व अक्षरी लिहिणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारची खाडाखोड करु नये.

८) निविदा सादर करताना दोन लिफाफा पध्दतीने कराव्यात.

९) महानगरपालिका निश्चित करील अशा तारखेला व वेळेवर निविदा दरपत्रक उघडण्यात येईल. त्यादिवशी निविदाधारक किंवा ह्यांचे प्रतिनिधींना उपस्थित राहता येईल. ते गैरहजर असले तरी निविदा उघडण्यांत येतील. निविदा दरपत्रक उघडताना प्रथम लिफाफा क्र. १ उघडण्यात येईल. लिफाफा क्र. १ मधील कागदपत्रे परिपुर्ण असल्यानंतरच लिफाफा क्र. २ उघडण्यात येईल.

१०) कोणतीही निविदापत्रिका पुर्णपणे किंवा अंशतः स्विकारणे किंवा आलेल्या सर्व निविदा दरपत्रक नाकारण्याचे अधिकार महानगरपालिकेचे आहेत. तसेच कोणतेही कारण न देता निविदा दरपत्रक रद्द करण्याचा अधिकार महानगरपालिकेचा आहे.

११) मंजुर निविदाधारकाकडुन नियमाप्रमाणे आयकर व अन्य कर बिलातुन कापुन घेण्यात येतील.

१२) निविदाधारकाची निविदा दरपत्रक नामंजुर झाल्यास इसारा रक्कम परत मिळण्यासाठी अर्ज केल्यास परत करण्यात येईल.



lw

१३) निविदाधारकाने योगा प्रशिक्षणाकरिता लागणारे आवश्यक ते साहित्य स्वखर्चाने आणने बंधनकारक राहिल.

१४) महापालिकेतील दिलेल्या लाभार्थ्यांच्या यादीतील लाभार्थ्यांना प्रशिक्षण देणे बंधनकारक राहिल.

१५) निविदाधारकाने निविदा सादर करताना निविदा दरपत्रकातील नियम व अटी मान्य असल्याबद्दल त्यावर नाव शिक्क्यासह सही केली पाहिजे. जर सही केली नसेल तर अशी निविदा विचारात घेतली जाणार नाही.

१६) मंजुर निविदेतील किंवा कोणतेही बाबतीत काहीही वाद निर्माण झाल्यास मा.आयुक्त यांचा निर्णय अंतिम दोन्ही पक्षांवर बंधनकारक राहिल. तसेच कायदेशीर कारवाई उभय बाजुंनी झाल्यास दोन्ही बाजुच्या च्या खर्चाची संपूर्ण जबाबदारी निविदाकारावर राहिल. विषयांकित कामाच्या निविदा व करारनाम्याच्या अटीशर्तीच्या अंमलबजावणीबाबत निर्माण वादाबाबत मा.न्यायालय, ठाणे हे कार्यक्षेत्र राहिल.

१७) वरील अटीशर्तीमध्ये कोणत्याही वेळी बदल करण्याचा अधिकार मा.आयुक्त यांचा राहिल. त्याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

**संजय शिंदे**
उपायुक्त(मबाक)
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

प्रति,

**मा.उप-आयुक्त सो.,**
मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.)

**महोदय,**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वरील निविदेचे सर्व नियम व अटी मी / आम्ही वाचल्या असुन त्या संबंधीची सर्व माहीती समजावून घेतली आहे. निविदेसंबंधी माझी / आमची कोणत्याही प्रकारची शंका राहिलेली नाही. सर्व शंकाचे निरसन झालेले आहे. हे निविदा दरपत्रक लक्षपुर्वक भरले आहे.

वरील निविदेचे नियम व अटी मला / आम्हाला बंधनकारक आहेत.

**दिनांक :-**

**निविदाधारकाची सही**

**शिक्का**

नाव :- --------------------------------

संपुर्ण पत्ता :- ------------------------------

------------------------------

------------------------------